# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि.१०/०९/२०१८

## जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, पुणे येथील महिला पोलीस हवालदारास दोन हजार रूपये लाचेची मागणी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केलेबाबत..

---

यातील तक्रारदार यांचे भाचावर दाखल असलेल्या गुन्हयात प्रतिबंधक कारवाई न करणे करिता जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, पुणे येथील पोलीस कर्मचारी श्रीमती घोडे यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे विभाग येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक ०२/०७/२०१८ रोजी पडताळणी केली असता, जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, पुणे येथील पोलीस कर्मचारी श्रीमती घोडे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे भाचावर दाखल असलेल्या गुन्हयात प्रतिबंधक कारवाई न करणे करिता २,०००/- रू. लाच रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून आज रोजी लोकसेवक श्रीमती तनश्री लक्ष्मण घोडे, वय ४२ वर्षे, पोलीस हवालदार,जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, पुणे याचेविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामिण, पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे